## दिनांक २४/०५/२०१० रोजी संपन्न झालेल्या जिल्हा उधोग मित्र समिती सभेचे इतिवृत

दि २४/०५/२०१० रोजी मा. श्री. प्रविण दराडे, जिल्हाधिकारी, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाचे सभागृहात जिल्हा उधोग मित्र समिती सभा संपन्न झाली.

सदर सभेत खालील अधिकारी व औधोगीक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र | उपस्थितांचे नांव | कार्यालय |
|---|---|---|
| १ | श्री. सुनिल सिर्सीकर | अध्यक्ष, एफआयए, विदर्भ |
| २ | श्री. शेखर अळेकर | सदस्य, एमआयए |
| ३ | श्री. हेमंत अंबासेलकर | सचिव, बुटीबोरी मॅन्यु. असोशिएशन |
| ४ | श्री. मोहन देव | समन्वयक MACCIA |
| ५ | श्री. संजय दांडेकर | एमआयडीसी, नागपूर |
| ६ | श्री.एम.एम. शुक्ला | सचिव, एमआयए असोसिएशन, हिंगणा |
| ७ | श्री.डी.एन.भुतडा | अध्यक्ष, कळमेश्वर एमआयडीसी असोसिएशन, कळमेश्वर |
| ८ | श्री. शरद ए. गलकाटे | उप अभियंता, एमआयडीसी हिंगणा नागपूर |
| ९ | श्री. एस.एस.गाडगे | उप अभियंता, एमआयडीसी विभाग-१ बुटीबोरी, |
| १० | श्री. के.टी.बोंद्रे | उप अभियंता एमआयडीसी ई एम विभाग हिंगणा |
| ११ | श्री.पी के भारती | सहाय्यक अभियंता, हिंगणा |
| १२ | श्री. अशोक अरनेरकर | विभागीय अधिकारी, एमआयडीसी नागपूर |
| १३ | श्री. आर. गजभिये | सहाय्यक नगर रचनाकार, नागपूर |
| १४ | श्री. पी. एस. मेश्राम | सहसचिव, बीएमए |
| १५ | श्री. डी.एस.उताणे | सचिव, बीएमए |
| १६ | श्री. एन.जी.मंगटानी | सहाय्यक अभियंता, मराविविकं, नागपूर अर्बन, नागपूर |
| १७ | श्री. डी.के.धोत्रे | उप अभियंता, साबांवि, विभाग-२, नागपूर |
| १८ | श्री. आर. एम. वैश्य | कार्यकारी , वीआयए, नागपूर |
| १९ | श्री. अभिजीत लिंगे | मे. दत्ता एन्टरप्रायजेस, एमआयडीसी बुटीबोरी |
| २० | श्री. अमित सोराखे | मे. आर्चिड सर्जिकल, बुटीबोरी एमआयडीसी, नागपूर |
| २१ | श्री. एम पी पराते | विभागीय कार्यालय, एमआयडीसी उद्योंग भवन नागपूर |
| २२ | श्री.एस.सी.टेंभुर्णे | सहाय्यक, एमएसएफसी, नागपूर |
| २३ | श्री.एम.डब्लु. इंगळे | सहा. व्यवस्थापक, सिकॉम , लि नागपूर |
| २४ | श्री. एस. गाढवे | उप प्रादेशिक अधिकारी, एमपीसीबी, उद्योग भवन नागपूर |
| २५ | श्री. जी.एन. नगराळे | कार्यकारी अभियंता, एनआरसी नागपूर |
| २६ | श्री. ए.पी. मुंजे | दुकाने निरीक्षक, अप्पर कामगार आयुक्त कार्यालय, नागपूर |
| २७ | श्री. एन.आर.गेडाम | किमान वेतन निरीक्षक, अप्पर कामगार आयुक्त कार्यालय, नागपूर |
| २८ | श्रीमती अमिता वि.देशमुख | खादी ग्रामोद्योग बोर्ड, नागपूर |
| २९ | श्री. निलेश जे. पाटील | फिल्ड ऑफीसर, एमपीसीबी, नागपूर |
| ३२ | श्री. जी.एस.उमप | सदस्य सचिव व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नागपूर |

## दिनांक २४/०५/२०१० रोजी संपन्न झालेल्या जिल्हा उधोग मित्र समिती सभेचे इतिवृत

| अ क | संघटनेचे नांव | बैठकीतील विषय | दि २४/०५/२०१० रोजी झालेल्या जिल्हा उधोग मित्र समितीतील निर्णय | कार्यवाही यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | अ | मागील सभेच्या कार्यवृत्तास मंजुरी | मागील दि ०६/०४/२०१० रोजी झालेल्या सभेच्या कार्यवृत्तास मंजुरी देण्यात आली. | |
| | ब | **जुने विषय** | | |
| १ | बीएमए नागपूर | तिस-या आय. टी. पार्क प्रगती बाबत :- | मे. मंत्री ग्रुप यांनी मऔविमकडे सादर केलेल्या मास्टर प्लॅन मध्ये मे. मंत्री ग्रुप यांचेकडुन दुरुस्ती करण्यात येवून तो पुढील मंजुरीकरीता मुख्यालय मुंबईकडे पाठविण्यात आल्याचे मऔविमंचे प्रतिनीधींनी सभेत सांगितले. | मऔविमं |
| २ | बीएमए नागपूर | १९९५ पुर्वी एमआयडीसी तर्फे एमआयडीसी बुटीबोरी मध्ये औद्योगिक वापरासाठी वाटप करण्यात आलेले भुखंड / जागा रद्द करण्याबाबत. | बुटीबोरी औधागिक क्षेत्रात ज्या घटकाने विहीत कालावधीमध्ये कार्यवाही केलेली नाही. अशा १७० घटकाचे भुखंडापैकी परत आलेल्या व पंचनामा करुन परत घेतलेल्या भुखंडामधुन १४६भुखंडाचे वाटप करण्यात आले. व २८ भुखंड वाटपास उपलब्ध आहेत असे मऔविमंचे प्रतिनिधींनी सभेत सांगीतले. रिकाम्या असलेल्या ८० भुखंड धारकांना प्रथम नोटीस देण्यात आली असून ३३ भुखंड धारकांना दुसरी नो्टीस देण्यात आलेली आहे. दुसरी नोटीस देण्यात आलेल्या भुखंड धारकांकडुन समाधानकारक उत्तर न आल्यास एक महिन्याचे आंत त्यांचेकडुन भुखंड परत घेण्यात येतील, असे मऔविमंच्या प्रतिनिधीनी सभेत सांगितले. तसेच वाटप झालेल्या भुखंडाची यादी तसेच रिकाम्या भुखंडाची यादी घटकाचे नावासह सीडीवर औद्योगिक संघटनेस विभागीय अधिकारी, मऔविमं यांनी पाठवावी असे ठरले. | विभागीय अधिकारी, मऔविम नागपूर |
| ३ | हळदगांव परीसरातील स्टोन क्रशिंग घटक | हळदगांव खदान ते मेनरोड, वर्धा हा खनिज निधीतून रस्ता तयार करण्याबाबत. | खनिकर्म कार्यालयातर्फे नोटीस देवुन व दुरध्वनीवर संपर्क साधुनही कोणीही प्रतिनिधी सभेस हजर न झाल्यामुळे सद्यस्थिती समितीस अवगत होवू शकली नाही. | खनिकर्म कार्यालय व सार्वजनिक बांधकाम विभाग (राज्य ) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | एमआयए | एमआयडीसी हिंगणा येथील दुरध्वनीबाबत | WLL Call Transfer Facility विनामुल्य आहे आणी ती घेतल्यास जुने दुरध्वनी क्रमांक बदलणार नाहीत असे मागील सभेत टेलीफोन विभागाचे प्रतिनीधीनी सांगितले होते. तसेच त्यावर तसा प्रस्ताव टेलीफोन विभागाने औद्योगिक संघटनेस दयावा असे ठरले होते. परंतु टेलीफोन विभागाचे कुणीही प्रतिनीधी सभेस हजर नसल्यामुळे त्यांचे स्तरावरील कार्यवाहीबाबत समजु शकली नाही. त्यांचे अनुपस्थितीबाबत औद्योगिक संघटनेने तसेच उपस्थितांनी तिव्र नाराजी व्यक्त केली. यावर मा. जिल्हाधिकारी यांचे स्वाक्षरीने महाव्यवस्थापक टेलीफोन यांना अशासकीय पत्र दयावे. तसेच त्यांची एक वेगळी सभा बोलावण्यात यावी असे ठरले. | भारत संचार निगम लिमीटेड, नागपूर |
| ५ | एमआयडीसी कळमेश्वर | दुरध्वनी सेवेबाबत | औद्योगिक संघटनेने टेलीफोन विभागाशी चर्चा करुन समस्यांचे निराकरण करावयाचा प्रयत्न करावा असे मागील सभेत ठरले होते. या संदर्भात औद्योगिक संघटनेच्या प्रतिनिधींची दुरध्वनी विभागाकडे पाठपूरावा केला असता त्यांना योग्य तो प्रतिसाद मिळाला नाही. व अशा चर्चेची गरज नसल्याचे सांगण्यात आले असे` औद्योगिक संघटनेचे प्रतिनिधींनी सभेत सांगितले. दुरध्वनी कार्यालयाशी घेण्यात येणा-या वेगळया सभेत हा देखील विषय घेण्यात यावा असे ठरले. | औद्योगिक संघटना, भारत संचार निगम लि, |
| ६ | मऔविम | बुटीबोरी एमआयडीसी क्षेत्रातील अवैध उत्खननाबाबत. | एमआयडीसी क्षेत्रातील अवैध उत्खनन सद्यस्थितीत बंद झाले असल्याचे कार्यकारी अभियंता, मऔविमं यांनी सभेत सांगितले. परंतु एमआयडीसी क्षेत्राबाहेर उत्खनन अजुनही चालु असते व ते पुन्हा अवैध उत्खनन मऔविमं क्षेत्रात करु शकतात असे औद्योगिक सघटनांनी सांगितले. यावर तहसिलदार हिंगणा व तहसिलदार, नागपूर ग्रामीण यांना कळविण्यात आल्याचे मा. जिल्हाधिकारी यांनी सभेत सांगितले. | तहसिलदार हिंगणा, तहसिलदार नागपूर ग्रामीण व मऔविमं |
| ७ | एमआयडीसी कळमेश्वर | कळमेश्वर बायपास रोड सुरु होण्याबाबत | कळमेश्वर बायपास रोड सार्वजनिक रहदारीकरीता सुरु झाला असला तरी तेथील डांबरीकरणाचे काम फार संथगतीने सुरु असल्याचे औद्योगिक संघटनेच्या प्रतीनीधींनी सभेत सांगितले. तसेच सदर रस्ता सद्यस्थितीत वाहतुकीस योग्य नसल्याचे औद्योगिक संघटनेच्या प्रतिनिधीनी सभेत सांगितले. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका-यांनी रस्त्याचे बहुतेक काम झाले असल्याचे सभेत सांगितले. यावर औद्योगिक संघटनेचे प्रतिनधिं व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांनी संयुक्तपणे तपासणी / पाहणी करावी असे ठरले.. | सार्वजनिक बांधकाम विभाग व औद्योगिक संघटना |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | एमआयए | E.S.I.S हॉस्पीटलच्या दुरावस्थेबाबत. | E.S.I.S इस्पितळातील उपकरणे बरीच जुनी असुन कार्यक्षम नाही. तिथे् वेळेवर डॉक्टर मिळत नाही. औषधी मिळत नाही. तसेच तिथे जाणा-या कामगारांची तेथील अधिकारी व कर्मचा-यांचे अनास्थेमुळे फार गैरसोय होते असे औद्योगिक संघटनेच्या पदाधिका-यांनी सांगितले. यावर संबधित विभागातील अधिका-यांशी जिल्हाधिकार-यां मार्फत एक वेगळी सभा घेण्यात यावी असे अध्यक्षांनी सभेस सुचिवले. तसेच बुटीबोरी येथे दवाखान्याकरीता प्लॉट मिळण्यासाठी E.S.I.S ने अर्ज केला असल्याचे व त्यांना त्वरीत प्लॉट देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी असे बीएमएच्या पदाधिका-यांनी सभेत मागणी केली. त्यावर भुखंडासाठी ऑन लाईन अर्ज केल्यास भुखंड प्रकरणात योग्य ती कार्यवाही होईल असे मऔविमंचे प्रतिनिधीनी सभेत सांगितले. | जिल्हा उद्योग केंद्र व E.S.I.S |
| ९ | **एमआयए** | कामगार खात्याकडुन बंद करण्याकरीता मिळणा-या ना हरकत प्रमाणपत्राबाबत. | सदर विषय मागील ब-याच सभांमध्ये चर्चिला गेला असून देखील यावर तोडगा निघत नसल्याबाबत औद्योगिक संघटनेने सभेत नाराजी व्यक्त केली. स्थानिक कामगार कार्यालयाने सदर विषयांबाबत त्यांचे मुंबई कार्यालयास वारंवार पत्रव्यवहार करुन देखील त्यांचे कडुन उत्तर येत नसल्याबाबत कामगार विभागाचे प्रतिनिधींनी सभेत सांगितले. यावर सदर विषय राज्यस्तरावरील असल्यामुळे राज्यस्तरीय उद्योग मित्र समिती सभेकडे पाठविण्यात यावा असे ठरले. (विषय बंद) | जिल्हा उद्योग केंद्र |
| १० | **बीएमए** | बुटीबोरी एमआयडीसी टी पांईट जवळच्या रस्त्यावरील रहदारीच्या असुविधेबाबत. | या विषयासंबंधात औद्योगिक संघटना, मऔविमं आणि नॅशनल हायवे यांची चर्चा झालेली असुन सदर कामाबाबत मऔविमने प्रस्ताव तयार करुन नॅशनल हायवे कार्यालयास दयावा असे ठरले. | मऔविम, नॅशनल हायवे् व औद्योगिक संघटना |
| ११ | **बीएमए** | बुटीबोरी मऔविमं क्षेत्रात विजेच्या दुरुस्तीसाठी शिडी असलेल्या वाहनाच्या गरजेबाबत. | बुटीबोरी मऔविम क्षेत्रात वेळोवेळी विद्युत संबधी दुरुस्तीकरीता शिडी असलेल्या वाहनाची गरज भासते. मराविविकं तर्फे ते देण्यात आल्यास फार सुविधा होईल अशी आद्योगिक संघटनेने मागणी केली. या संदर्भात असे वाहन किरायाने घेण्या संदर्भात प्रस्ताव मंजुरीकरीता मुख्य अभियंता मराविविकं यांचेकडे पाठविण्यात आल्याचे मराविविकं अधिका-यांनी सांगितले. | मराविविकं व औद्योगिक संघटना |
| १२ | **बीएमए** | अवैधपणे Fly Ash | सद्यस्थितीत मे.इंडोरामा या घटकाला एमपीसीबी मंडळाने नोटीस बजावल्यावर Fly Ash च्या वाहतुकीदरम्यान योग्य ती काळजी घेत असून उद्योजकांना | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | मऔविमं क्षेत्रात डम्प करण्याबाबत. | कोणताही त्रास नसल्याचे तसेच हा विषय विषयसुचीवरुन वगळण्याबाबत औद्योगिक संघटनेच्या प्रतिनिधींनी सांगितले. (विषय बंद) | |
| १३ | **व्हीआयए व एमआयए** | मऔविमं हिंगणा क्षेत्रात होणा-या प्रदुषित पाणी पुरवठयाबाबत. | महाराष्ट्र जिवन प्राधिकरण कार्यालयाने पाणी देण्यास सहमती कळविल्याप्रमाणे प्रस्ताव मुख्यालयास सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर मुख्यालयाने दर आकारणीबाबत संबधीत औद्योगिक संघटने सोबत चर्चा करण्यांत यावी असे कळविले. त्या अनुषंगाने श्री. चंदर खोसला, अध्यक्ष, एमआयए यांचे सोबत दिनांक १९/०५/२०१० रोजी चर्चा करण्यात आली. सदर चर्चेच्या अनुषंगाने प्रस्ताव मुख्यालयास सादर करण्यात आला आहे असे मऔविमं चे प्रतिनीधींनी सभेत सांगितले. | मऔविमम‌ं |
| १४ | **बीएमए** | मे. आर्चिड सर्जिकल बुटीबोरी यांना विद्युत पुरविण्याबाबत. | मे. आर्चिड सर्जिकल यांना ए १३/२३, बुटीबोरी, एमआयडीसी या उद्योगाची प्रकल्प किंमत फक्त रु.२५ लाख असून त्यांना विद्युत जोडणीकरीता मराविविकं तर्फे रु.४.५० लाख ची मागणी करण्यात आली असे सभेत सांगण्यात आले. यावर प्रकरणात योग्य ती माहिती घेवून पुढील सभेत अवगत करण्यात येईल असे मराविविकं च्या अधिका-यांनी सभेत सांगितले. | मराविविकं |

सर्व उपस्थित सभासदांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यांत आले.

मा. जिल्हाधिकारी
नागपूर

महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र,नागपूर.

## जिल्हास्तरीय आजारी उद्योग समिती सभेचे कार्यवृत्त दि.२४/०५/२०१०

दि २४/०५/२०१० रोजी मा.प्रविण दराडे, जिल्हाधिकारी, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाचे सभागृहात जिल्हास्तरीय आजारी उद्योग समितीची सभा संपन्न झाली.

सदर सभेत खालील अधिकारी व औधोगीक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र | उपस्थितांचे नांव | कार्यालय |
|---|---|---|
| १ | श्री. सुनिल सिर्सीकर | अध्यक्ष, एफआयए, विदर्भ |
| २ | श्री. शेखर अळेकर | सदस्य, एमआयए |
| ३ | श्री. हेमंत अंबासेलकर | सचिव, बुटीबोरी मॅन्यु. असोशिएशन |
| ४ | श्री. मोहन देव | समन्वयक MACCIA |
| ५ | श्री. संजय दांडेकर | एमआयडीसी, नागपूर |
| ६ | श्री.एम.एम. शुक्ला | सचिव, एमआयए असोसिएशन, हिंगणा |
| ७ | श्री.डी.एन.भुतडा | अध्यक्ष, कळमेश्वर एमआयडीसी असोसिएशन, कळमेश्वर |
| ८ | श्री. शरद ए. गलकाटे | उप अभियंता, एमआयडीसी हिंगणा नागपूर |
| ९ | श्री. एस.एस.गाडगे | उप अभियंता, एमआयडीसी विभाग-१ बुटीबोरी, |
| १० | श्री. के.टी.बोंद्रे | उप अभियंता एमआयडीसी ई एम विभाग हिंगणा |
| ११ | श्री.पी के भारती | सहाय्यक अभियंता, हिंगणा |
| १२ | श्री. अशोक अरनेरकर | विभागीय अधिकारी, एमआयडीसी नागपूर |
| १३ | श्री. आर. गजभिये | सहाय्यक नगर रचनाकार, नागपूर |
| १४ | श्री. पी. एस. मेश्राम | सहसचिव, बीएमए |
| १५ | श्री. डी.एस.उताणे | सचिव, बीएमए |
| १६ | श्री. एन.जी.मंगटानी | सहाय्यक अभियंता, मराविविकं, नागपूर अर्बन, नागपूर |
| १७ | श्री. डी.के.धोत्रे | उप अभियंता, साबांवि, विभाग-२, नागपूर |
| १८ | श्री. आर. एम. वैश्य | कार्यकारी , वीआयए, नागपूर |
| १९ | श्री. अभिजीत लिंगे | मे. दत्ता एन्टरप्रायजेस, एमआयडीसी बुटीबोरी |
| २० | श्री. अमित सोराखे | मे. आर्चिड सर्जिकल, बुटीबोरी एमआयडीसी, नागपूर |
| २१ | श्री. एम पी पराते | विभागीय कार्यालय, एमआयडीसी उद्योंग भवन नागपूर |
| २२ | श्री.एस.सी.टेंभुर्णे | सहाय्यक, एमएसएफसी, नागपूर |
| २३ | श्री.एम.डब्लु. इंगळे | सहा. व्यवस्थापक, सिकॉम , लि नागपूर |
| २४ | श्री. एस. गाढवे | उप प्रादेशिक अधिकारी, एमपीसीबी, उद्योग भवन नागपूर |
| २५ | श्री. जी.एन. नगराळे | कार्यकारी अभियंता, एनआरसी नागपूर |
| २६ | श्री. ए.पी. मुंजे | दुकाने निरीक्षक, अप्पर कामगार आयुक्त कार्यालय, नागपूर |
| २७ | श्री. एन.आर.गेडाम | किमान वेतन निरीक्षक, अप्पर कामगार आयुक्त कार्यालय, नागपूर |
| २८ | श्रीमती अमिता वि.देशमुख | खादी ग्रामोद्योग बोर्ड, नागपूर |
| २९ | श्री. निलेश जे. पाटील | फिल्ड ऑफीसर, एमपीसीबी, नागपूर |
| ३२ | श्री. जी.एस.उमप | सदस्य सचिव व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नागपूर |

१.	मागील दि.०६/०४/२०१० रोजी झालेल्या सभेच्या कार्यवृत्तास सर्वानुमते मंजुरी घेण्याबाबत विषय ठेवला असता त्या सभेच्या अनुक्र.४ वरील मे. युनिवर्सल अस्बेस्टॉस सिमेंट प्रॉडक्टस, डी-१८, एमआयडीसी हिंगणा, नागपूर यांचे प्रकरणांत बँक ऑफ महाराष्ट्र सिताबर्डी यांचे स्तरावर Accountability ची कार्यवाही चालु असल्याबाबत कुठलेही वक्तव्य बॅक ऑफ महाराष्ट्र चे प्रतिनिधींनी सभेत केले नसल्याबाबत बॅक ऑफ महाराष्ट्र चे दि.२४/०५/२०१० चे पत्र प्राप्त झाल्याचे महाव्यवस्थापक यांनी सभेत सांगितले. यावर तसे वक्तव्य सभेत करण्यात आल्याचे तसेच ते कार्यवृत्तातून वगळण्यात येवू नये असे उपस्थित सभासदांनी सांगितले. त्यावर मा. अध्यक्षांनी दुजोरा दिला.

२.	मे. युनिवर्सल अस्बेस्टॉस सिमेंट प्रॉडक्टस, डी-१८, एमआयडीसी हिंगणा, नागपूर यांचे प्रकरणात वरील मुददा क्र.१ मध्ये नमुद केल्याप्रमाणे बँकेचे पत्र प्राप्त झाले असून सदर खाते हे मार्च २००७ मध्ये बंद झाल्याचे आणि त्यामुळे बँक ऑफ महाराष्ट्र च्या प्रतिनिधींना सभेस बोलावण्यात येवु नये असे बँक ऑफ महाराष्ट्र ने कळविल्याचे महाव्यवस्थापकांनी सभेत सांगितले. संबधित प्रकरणात उद्योजकाने CBI ची मदत घ्यावी असे अध्यक्षांनी सुचविले. (विषय बंद)

३.	रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार आर्थिक मंदीच्या काळात राष्ट्रीयकृत तसेच सहकारी बँकानी औद्योगिक घटकांना रीफेजमेंटचे फायदे दयावे अशी औद्योगिक संघटनेच्या प्रतिनीधींनी सभेत सुचना केली. सदर विषय बँकेच्या पुढील DLCC सभेत घेण्यात यावा असे अध्यक्षांनी सुचिवले. त्यावर जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापकांनी DLCC सभेत घेण्याचे मान्य केले.

४.	मे. आर.आर.खंडेलवाल यांचे प्रकरणात मिनीस्ट्री ऑफ फायनान्स, रजिस्टॉर, डीआरटी तर्फे डीआरटी, नागपूर तसेच सेंट्रल बँक, झोनल आफीस, नागपूर यांना दिलेल्या दि. ०९/०४/२०१० च्या पत्राची प्रत मिळविण्याकरीता सभेमार्फत प्रयत्न व्हावे अशी औद्योगिक संघटनेच्या प्रतिनिधींनी विनंती केली. यावर ही समिती किंवा जिल्हाधिकारी हे डीआरटी ला कोणत्याही सुचना करु शकत नाही असे मा. जिल्हाधिकारी यांनी सांगितले. (विषय बंद)

सर्व उपस्थित सभासदांचे आभार मानुन सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

मा. जिल्हाधिकारी
नागपूर

महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र,नागपूर.